.

७४७ एस.सी.आर. सर्वोच्च न्यायाल्याचे अहवाल (१९५०)

ऑक्टोबर २०१२

कपूर चंद

विरुद्ध

कदरेनूसा बेगम व इतर

(मेहरचंद महाजन आणि आर.एस. नाईक आणि खलीलूझमान जे.जे.)

मुस्लीम कायदा – डावर – डावरच्या बदल्यात विधवेच्या ताब्यात पतीची मालमत्ता – तिला इतर कर्जदारांपेक्षा प्राधान्य मिळण्याचा हक्क आहे का ? विधवेच्या डावरकरता मालमत्तेवरील धारणाधीकाराचे स्वरूप ?

पतीच्या इतर वारसदारांच्या संमतीने किंवा अन्यथा, की त्या डावरच्या बदल्यात तिच्या पतीच्या मालमत्तेच्या ताब्यात असलेल्या मुस्लीम विधवेला त्याच्या इतर असुरक्षित कर्जदारांच्या तुलनेत प्राधान्य मिळण्यास ती पात्र नाहीत. डावरच्या स्वरुपात असे काहीही नाही की, जे त्याला प्राधान्याचा हक्क देते.

अमीर अम्मल विरुद्ध शंकर नारायण चेट्टी (आय.एल.आर. २५ मद्रास ६५८), मीर मेहर अली विरुद्ध मिस्ट्रेस अमानी (११ डबलू.आर. २१२), मामा बिवी विरुद्ध वासी अह्मद (आय.एल.आर. ४१ अल्लाहाबाद ५५८), हमीरा बीबी विरुद्ध झुबेदा बीबी

(ए.आय.आर. १९१६ पी.सी. ४६), इम्तीयाज बेगम विरुद्ध अब्दुल करीम खान (ए.आय.आर. १९३० अल्लाहाबाद ८८१) चा संदर्भ दिला.

कुलसुम बीबी विरुद्ध शियम सुंदर लाल (ए.आय.आर. १९३६ *अल्लाहाबाद* ६००), *मिस्ट्रेस गफूरन विरुद्ध रामचंद्र दास* (ए.आय.आर. १९३४ *अल्लाहाबाद* १६८), मोहम्मद *तुराबुद्दिन विरुद्ध यासीन बेगम* (१७ डी.एल.आर. २२४) *नाकारले.*

मैनाबिबी विरुद्ध चौधरी वकील अहमद (५२ *आय.ए.* १४५) *स्पष्ट केले.*

भारतीय संविधानच्या अनुछेद ३७४ (४) अंतर्गत हायद्राबाद उच्च न्यायलयाच्या निकालाविरुद्ध अपील : दिवाणी अपील क्र. १८९/१९५०.

अब्दुल वाहिद ओवेसी - अपीलकारा करिता

अहमद सईद खान – उत्तरवादी क्रमांक १ करिता

१९५० ऑक्टोबर १२. न्यायमूर्ती खलिल उज्मान यांनी न्यायनिर्णय पारित केला -------

हे अपील हुकुमनाम्याच्या कार्यवाहीतून उद्भवते. अपिलकर्ता कपूरचंद याचाकडे, इतरांबरोबरच, उत्तरवादी कदरेनूसा चा पती मीर हमीद अली खान याचा विरुद्ध पैशाचा हुकूमनामा होता. हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीतील वादग्रस्त घर मृत निर्णय कर्जदारांच्या मालकीचे होते ते जप्त केले गेले. मृत कर्जदाराच्या विधवेने तिच्या डावरच्या थकबाकीच्या मोबदल्यात ते घर तिच्या ताब्यात आहे आणि तिची डावरची मागणी पूर्ण होईपर्यंत तो ताबा काढून घेतला जाऊ शकत नाही ह्या कारणावरून जप्तीवर आक्षेप घेतला. अंमलबजावणी न्यायालयाने तिचा आक्षेप मंजूर केला आणि

प्रतिवादीच्या दाव्याला अधीन राहून ते घर विकण्याचे आदेश दिले. हुकूमनामा धारक दावा मिळकतीच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून डावरची थकबाकी दिल्यानंतर जर काही अतिरिक्त रक्कम शिल्लक असेल तर तो ती मिळण्यास हक्कदार आहे असे आदेश देण्यात आले. विक्रीमध्ये त्या घराला डावरच्या देय रक्कमेपेक्षा जास्त पैसे मिळण्याची शक्यता नव्हती. न्यायालयाने असे मत मांडले की, इतर अप्रतीभूत धनको पेक्षा विधवा दाव्याला प्राधान्य आहे आणि तिची स्थिती प्रतिभूत धनकोच्या स्थिती सारखीच आहे. हुकुमनामा धारकाने उच्च न्यायालयात पुंर्निर्क्षण अर्ज केला पण त्यात कुठेही यश मिळाले नाही. त्यानंतर त्यांनी राज्याच्या न्यायिक समितीकडे अपील दाखल केले आणि ते आता राज्य घटनेच्या अनुच्छेद ३७४(४) अंतर्गत आपल्यासमोर आहे.

इतर वारसदारांच्या समत्तीने तिच्या डावरच्या दाव्याचा बदल्यात तिच्या पतीच्या मालमत्तेचा ताबा असलेली विधवा कदरेनूसा ही तिच्या पतीच्या इतर असुरक्षित कर्जदारांविरुद्ध प्राधान्याची हक्कदार आहे किंवा नाही हा या याचिकेतील निर्णयाचा एकमेव मुद्दा आहे, असे मान्य केलेले आहे की तिचा पती वादातले घर सोडून मरण पावला आणि त्याने हुकुमनामाधारकाच्या सोबत इतरही बरीच कर्जे करून ठेवलेली होती. त्याने पत्नीच्या नावे बोजा किंवा कोणत्याही सावकाराच्या नावे गहान ठेवलेले नव्हते. जर पतीने आपल्या पत्नीच्या डावरच्या दाव्याच्या बदल्यात दावा मिळकतीवर तिच्याकरिता म्हणून कोणताही बोजा तयार केला असता तर इतर असुरक्षित कर्जदारांपेक्षा तिला प्राधान्य दिले गेले असते यात शंका नाही. असुरक्षित कर्जाच्या संदर्भात कोणत्याही कर्जदाराच्या दाव्यापेक्षा विधवेचा डावरचा दावा उच्च स्तरावर

आहे या युक्तिवादाच्या समर्थनार्थ कुराणातील विशीष्ठ मजकुराचा किंवा मुस्लीम कायद्यातील इतर कोणत्याही अधिकाराचा उल्लेख केलेले नाही. सूर-ए-निसा मधील एका उत्तारयाचा संदर्भ देण्यात आला होता की ज्यामध्ये पतीला त्याचा पत्नीला डावर देण्याचा आदेश देण्यात आलेला आहे आणि त्यात असेही म्हटले आहे की, विधवा आणि अल्पवयीन मुलांना अनुकूल वागणूक दिली जावी. हा मजकूर विधवेच्या डावरच्या दाव्याला, इतर दाव्यांप्रमाणे संपूर्ण संरक्षण देत नाही. दुसरीकडे मुसलमनाला त्याच्या बांधिलकीचे पालन करण्याचे आणि त्याचे करार विश्वासूपणे पाळण्याचे आणि त्याच्या जबाबदऱ्या प्रामाणिकपणे पार पाडण्याचे आदेश दिले जातात. एकीकडे डावरची परतफेड आणि दुसरीकडे इतर कर्जांची परतफेड ह्या संबंधीच्या आदेशांमध्ये कोणताही फरक केला जात नाही. अपिलकर्त्याचे विद्वान वकील असे प्रतिपादन करतात की, मृत व्यक्तीच्या इतर वारसांच्या समत्तीने तिच्या डावरच्या बदल्यात तिचा पतीच्या मालमत्तेवर ताबा असला तरीही विधवा महिलेचा दावा असुरक्षित कर्जदारांच्या दाव्यापेक्षा श्रेष्ठ नाही, जरी त्यांच्या अनुउपस्तिथीत तिला मालमत्ता वारसांमध्ये वाटण्यापूर्वी पूर्ण मोबदला मिळण्याचा अधिकार आहे. पवित्र कुराणातील काही परिच्छेदांकडे आणि ह्या विषयावरील इतर न्यायशास्त्रज्ञ यांच्या लेखनाकडे त्यांनी आमचे लक्ष वेधले. तथापि, उत्तरवादीच्या विद्वान वकिलांनी विधवा महिलेला तिच्या पतीच्या मालमत्तेवर, तिच्या थकबाकीच्या हप्त्यासाठी धारणाधिकार असतो, आणि जेंव्हा तिच्या पतीच्या निधनानंतर ती त्याच्या घराचा ताबा घेते तेंव्हा जो पर्यंत तिचा दावा मैताचे वारसदार किंवा असुरक्षित कर्जदारांकडून पूर्ण होत नाहीत तो पर्यंत तिला

घराचे ताब्यापासून बेदखल केले जाऊ शकत नाही. त्यांनी हैद्राबाद उच्च न्यायाल्याच्या आणि भारतातील इतर काही उच्च न्यायालयांच्या निर्णयावर आपली भिस्त ठेवली.

या विषयावरील विविध निकालांची काळजीपूर्वक तपासणी केल्यास असे दिसून येते की, या विषयावरील कायद्याचे विधान तय्यबजी यांच्या ‘मुस्लीम कायदा’ (१९४० आवृत्ती) या पुस्तकात योग्यरित्या, ह्या शब्दात स्पष्ट केला गेला आहे.

1) विधवा तिच्या धारणाधीकाराने इतर कर्जदारांपेक्षा कोणतेही प्राधान्य धरण करत नाहीत.

2) कर्ज म्हणून मेहरला इतर वारसदारांच्या आपापसात मालमत्ता वाटून घेण्याच्या दाव्यापेक्षा प्राधान्य आहे. विधवा मालमत्तेच्या ताब्यात आहे किंवा नाही या वस्तुस्थितीमुळे या दोन बाबींवर परिणाम होत नाही. यावरून हे स्पष्ट दिसते की, जो पर्यंत पती स्वतःच्या कृतीद्वारे विधवेला त्याच्या इतर कर्जदरांपेक्षा वरच्या स्थितीत ठेवत नाही तो पर्यंत तिचा डावरचा दावा हा असुरक्षित कर्जाच्या स्वरूपाचा असतो आणि तिला तिच्या पतीच्या इतर असुरक्षित कर्जदारांच्या विरोधात कोणत्याही प्रकारचे प्राधान्य नाही. कुराणातील सुरई-निसा, रुकू-४ मधील मजकुरात वारस आणि वारसाहक्का पेक्षा डावर देण्याला प्राधान्य देण्यात आले आहे, परंतु इतर कर्जदारांच्या संबंधी डावरच्या प्राधान्याच्या प्रश्नावर तो गप्प आहे. मुबसुत खरखासी, खंड २९, किताबुल्फायीझ मधील पान क्र. १३७ मध्ये असे सूचित केले आहे की, कर्ज फेडन्याला वारस आणि इच्छापत्रापेक्षा प्राधान्य असते. मृत मुस्लिमाच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनात, फतवा-ए-

आलमगिरी सारख्या सुरुवातीच्या ग्रंथ लेखकांनी आणि फत्व्यानी घालून दिलेला नियम असा आहे की, प्रथमतः मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराची भरपाई मालमत्तेतून केली जावी आणि ती पूर्ण झाल्यानंतर, त्याच्याकडून देय असलेल्या कर्जाची परतफेड केल्यानंतर मालमत्ता उत्तराधिकारी आणि वारसदारांमध्ये विभागली जावी. जरी विधवेने तिच्या पतीच्या मृत्यु नंतर त्याच्या मालमत्तेचा ताबा घेतला असला तरी इतर असुरक्षित कर्जदरांपेक्षा तिला तिच्या येण्याबाबत कोणतेही प्राधान्य देण्यात आलेले नाहीत.

असे म्हटले जात होते की, विधवेच्या डावरच्या दाव्याचे स्वरूप असे आहे की, ते तिच्या पतीच्या मालमत्तेवरील धारणाधिकार (lien) आहे. धारणाधीकाराचा दावा या गृहीतकावर आधारित आहे की डावर देण्याची जबाबदारी ही विवाहसाठीची विचारात घेण्याची गोष्ट (consideration) आहे आणि ते केवळ पत्नीचा आदर म्हणून स्वीकारलेली आर्थिक जबाबदारी नाही. हॅमिल्टनच्या 'हेडाया' (१८७० आवृत्ती पृष्ठ क्रमांक ४४) ह्या हनाफी कायद्यावरील अग्रगण्य पाठ्यपुस्तकानुसार एखाद्या इसमाने दहा किंवा त्याहून अधिक डायमसचे डावर ठरविले आणि लग्न केले आणि ते लग्न पूर्ण झाले किंवा त्याच्या मृत्यु नंतर ते लग्न संपुष्टात आले तर अश्या दोन्ही परिस्थितीमध्ये त्याच्या पत्नीला संपूर्ण डावरची रक्कम मागण्याचा अधिकार प्राप्त होतो कारण लग्नाचा उदेश पूर्ण झाल्यानंतर तिचा डावरचा दावा हा निश्चित

(absolute) होतो. डावरही तिची मालमत्ता बनते आणि ती तिच्या वारसांना दिली जाऊ शकते आणि ती तिच्या पतीच्या मालमत्तेतून भरावी लागते. पतीवर, त्याच्या मालमत्तेतून फेडायचे कर्ज असे डावरचे वर्णन केले गेले आहे. मुस्लीम महिलेला द्यावा लागणारा डावर हा तिचे लग्न ठरण्याआधी तिच्या हक्कामधील झालेला एक ठराव आहे आणि रोमन लोकांच्या अशाच ठरावाच्या स्वरूपाचा आहे आणि तो एका अनिवार्य स्वरूपाचा आहे की लग्नाच्या आधी किंवा वेळी तसा उल्लेख नसेल तर तो योग्य ठराव रक्कमेच्या मर्यादेपर्यंत अस्तित्वात असलेचे मानले जाते. हिब्रू लोकांमध्ये विवाह संपुष्टात आल्यानंतर ठरविण्यात आलेला डावर स्त्रीच्या वापराकरिता वापरला जात होता. यहुद्यान मध्ये देखील असेच विचार न करता केलेले विवाह अवैध ठरविले जात होते. श्री. अमीर अली ह्यांनी आपल्या मुस्लीम कायद्यावरील पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे ही प्रथा प्राचीन काळात पतींनी त्यंच्या पत्नींना त्यांच्या उपजीवीकीचे साधन म्हणून आणि घटस्फोटाच्या अधिकाराच्या मनमानी वापराविरुद्ध संरक्षण म्हणून देण्याकरिता उद्भभवली. मुस्लीम संकल्पनेत डावरला वधूच्या वडिलांना, जेव्हा तिचे लग्न होते तेंव्हा इतर काही कायद्यांप्रमाणे वधूची किंमत म्हणून देण्याचा कोणताही संदर्भ नाही. दुसरीकडे डावर हे पत्नीद्वारे तिच्या देहाच्या समर्पनाकरिता ऋण मानले जाते. वरील चर्चेचा परिणाम असा आहे की, डावर हा केवळ

विवाह ठरविण्याचा एक भाग आहे आणि लग्न ठरविण्याचा एक विचार आहे (consideration). हा पतीच्या करारातून उद्भवणारा दावा आहे त्यामुळे त्या दाव्याला मृत्यूपत्राद्वारे मिळालेली किंवा वारसाहक्काद्वारे मिळालेल्या मिळकतीपेक्षा प्राधान्य दिलेले आहे परंतु मुस्लीम कायद्याच्या कोणत्याही तत्वावर त्याला इतर कोणतेही कर्जापेक्षा प्राधान्य असू शकत नाही. त्यामुळे आमच्या मते कोणतेही न्याय विचारावर, किंवा त्याच्या स्वभावातच काहीतरी अंतर्भूत आहे की जे त्याला प्राधान्याचा हक्क देते, या आधारावर डावरच्या दाव्याला इतर कोणत्याही कर्जांवर प्राधान्य देता येत नाही.

या विषयावरील आधी निकाल झालेल्या निकालांचा पडताळा घेणे आता सोयीचे झालेले आहे. अमीर अम्मल विरुद्ध शंकर नारायण चेट्टी (१) या खातल्यामध्ये मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, न दिलेल्या डावरचा दावा म्हणजे इतर कर्जदारांच्या मागण्यानुसार देय असणाऱ्या कर्जा सारखेच आहेत आणि त्याला प्राधान्य देयता नाही. मैना बीबी विरुद्ध चौधरी वकील अहमद (२) या खटल्यात असे म्हटले गेले होते की, जर विधवा प्रतिभूत धनकोच्या स्थितीत नसेल आणि वारसांच्या संमतीने पतीच्या मालमत्तेच्या ताब्यात असेल तर तिला तिचा डावर कर्ज फेडले जाई पर्यंत ती मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा अधिकार आहे. न्यायमूर्तींनी असे निरीक्षण नोंदिवले

की, ताब्यात असलेल्या विधवेचा अधिकार हा शब्दाच्या कठोर अर्थाने धारणाधिकार (lien) आहे की नाही हे ठरविणे आवश्यक नाही अधिकार काहीही असो तो कर्जदार म्हणून विधवेच्या तिच्या डावरकरता तिच्या पतीची मालमत्ता धरण करण्याचा अधिकारावर आधारित असल्याचे दिसते, ज्याची तिने कायदेशीररित्या मालकी घेतली आहे आणि तिचे कर्ज पूर्ण होईपर्यंत बळजबरी किंवा फसवणुकीशिवाय ताबा मिळविलेला आहे. हा निर्णय विधवेला इतर कोणत्याही कर्जदरापेक्षा उच्च स्थानावर ठेवत नाही. वारसांच्या तुलनेत सर्व कर्जदारांना मालमत्तेचे वाटप होण्यापूर्वी प्राधान्याने पैसे द्यावे लागतात. मीर मेहर अली विरुद्ध मिस्ट्रेस अमानी (३) मध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की, तिच्या ताब्यात असलेल्या मालमत्तेवरील विधवेचा धारणाधिकार हा सामान्य कायदेशीर अर्थाने धारणाधिकार नाही आणि डावरचा हक्क इतर कोणत्याही सामान्य कर्जदाराच्या सारखाच आहे आणि त्यांना समान दर्जा देतो आणि इतर कर्जाप्रमाने वारसांना काहीही घेण्याचा अधिकार निर्माण होण्यापूर्वी त्याची परतफेड करावी लागते. मैना बीबी विरुद्ध वसी अहमद (४) मध्ये असे म्हटले आहे की, प्रतिभूत धनको नसल्याने, धनको विरुद्ध ताब्याचा अधिकार विधवेला नाही. पृष्ठ क्रमांक ७४७ वर खालील निरीक्षणे आहेत 'ती धनको विरुद्ध, ताब्याचा असा कोणताही अधिकार मांडू शकत नाही की ज्याद्वारे तिच्या

नवऱ्याकडून देय असणारी कर्जे आधी त्याच्या इतर मालमत्तेतून वसूल करून होण्यात यावी तिचा डावर वसूल करून मागण्याचा हक्क, तिच्या नवर्याच्या इतर धनको समानच आहे’.

हमीद बीबी विरुद्ध झुबेदा बीबी (१) मध्ये असे दिसून आले की डावर हे कर्जासमान आहे आणि पत्नीस पतीच्या मृत्यू नंतर इतर कर्जदरांसह त्याच्या मालमत्तेतून तिच्या देयाकीची फेड होण्यास ती पात्र आहे, तथापि इतर कोणत्याही अप्रतीभूत धनकोच्या तुलनेत तिचा अधिकार मोठा नाही वारसांसोबत तिच्याकडे धारणाधिकार आहे. इमतीयाज बेगम विरुद्ध अब्दुल करीम खान (२) मध्ये ही हाच दृष्टीकोन व्यक्त करण्यात आला होता. श्री. मुल्ला यांनी आपल्या मुस्लीम कायद्यावरील पुस्तकात परिच्छेद २९५ मध्ये असा दृष्टीकोन स्वीकारला आहे की, डावर हे एक कर्ज आहे आणि इतर कर्जदरांसह विधवा देखील मालमत्तेतून त्याची पूर्तता करण्यास पात्र आहे आणि तिचा अधिकार इतर कोणत्याही कर्जदाराच्या हक्कापेक्षा मोठा नाही. उत्तरवादीच्या विद्वान वकिलांनी कुलसुम बीबी विरुद्ध शाम सुंदर लाल (३) मधील निर्णयावर भर दिला, की ज्यामध्ये असे म्हटले होते की, तिच्या पतीच्या मालमत्तेवर ताबा असलेल्या विधवेला तिच्या पतीच्या इतर वारसांच्या विरोधात आणि कर्जदारांच्या विरोधात तिचा हक्क पूर्ण होईपर्यंत ताबा ठेवण्याचा हक्क आहे. हाच दृष्टीकोन यापूर्वी मिस्ट्रेस

गफुरण विरुद्ध रामचंद्र दास (४) मध्ये एकाल न्यायाधीश यांनी घेतला होता आणि त्यात म्हटले होते की, जो पर्यंत तिचे कर्ज फेडले जात नाही तोपर्यंत तिच्या ताब्याला अडथला आणला जाऊ शकत नाही. मोहम्मद तुराबुद्दिन विरुद्ध यासीन बेगम (५) या प्रकरणात हैद्राबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, विधवेचा डावर साठीचा दावा हा सुरक्षित कर्जाच्या स्वरूपाचा आहे. त्या प्रकरणात वारस आणि विधवा यांच्या शिवाय इतर कोणीही कर्जदार नव्हता. तथापि, वाहिदुनिसा बेगम विरुद्ध यासीन बेगम (६) मध्ये असे निदर्शनास आणून दिले होते की, विधवेच्या दिव्यामुळे मालमत्तेमध्ये कोणताही हक्क किंवा बोजा निर्माण होत नाही जेथे तिचे डावर दिलेले असते तिथे तिचे स्थान न केवळ कर्जदाराचे असते तर ते वारस म्हणून देखील असते.

ह्या सर्व निकालांचा परिणाम असा आहे की, वर नमूद केलेले दोन अल्लाहाबाद उच्च न्यायाल्याचे निर्णय आणि हैद्राबाद उच्च न्यायालयाचा निर्णय वगळता बहुतांश निकाल हे विधवा महिलेला तिच्या पतीच्या इतर अप्रतीभूत धनकोवर तिच्या डावरच्या दाव्याविषयी कोणतेही प्राधान्य देण्याच्या विरोधात आहेत. आमच्या मते वर नमूद केलेले अल्लाहाबाद उच्च न्यायालायचे दोन निर्णय ह्या मुद्द्यावर कायदा योग्य प्रकारे मांडत नाहीत आणि अमीर अम्मल विरुद्ध शंकर नारयण

चेट्टी या मध्ये कायदा योग्यप्रकारे मांडलेला आहे. मृत मुस्लिमांच्या मालमत्तेचे सुरक्षित कर्जदरांमध्ये प्रमाणानुसार वाटप केले जात असल्याने मुस्लीम कायद्याच्या तत्वानुसार काहीही तिरस्करणीय किंवा असमान नाही.

वर दिलेल्या कारणांमुले आम्ही असे मानतो की, विधवेने उपस्थित केलेल्या आक्षेपात कोणतेही तथ्य नव्हते आणि अंमलबजावणी न्यायालयाने मालमत्ता विकण्याचे आणि विक्रीतून मिळणारी रक्कम हुकूमनामाधारक आणि विधवे मध्ये समान दराने वितरीत करण्याचे निर्देश द्यायला हवे होते. परिणामी आम्ही हे अपील मान्य करतो आणि खालील दोन न्यायालयांचे निर्णय रद्द करतो आणि अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला येथे केलेल्या निरीक्षणानुसार अमलबजावणी सुरु ठेवण्याचे निर्देश देतो. खटल्याच्या परिस्थितीत ह्या कार्यवाहीच्या खर्चबाबत कोणतेही आदेश देणार नाही.

अपील मंजूर करण्यात आले.

1) *आय.एल.आर.२५ मद्रास* ६५८

2) ५२ *आय.ए.*१४५

3) ११ *द्ब्ल्यू.आर.*२१२

4) *आय.एल.आर.*४१ *अल्लाह* ५३८

1) *ए.आय.आर.१९१६ पी.सी.४६*

2) *ए.आय.आर.१९३० अल्लाहा ८८१*

3) *ए.आय.आर.१९३६ अल्लाह ६००*

4) *ए.आय.आर.१९३४ अल्लाह १६८*

5) *१७ डी.एल.आर. २२४*

6) *३२ डी.एल.आर.४२१*

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x